महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

दिनांक 31 ऑगस्ट 2012 रोजी मा.अध्यक्षांच्या दालनात घेण्यात येणा–या बैठकीसाठी कार्यसूची .

1. दिनांक 16 जुलै 2012 चे इतिवृत्त मान्य करण्यात यावे.

2. शाळा सोडून जाणा–या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता सामाजिक संस्था निश्चित करण्याकरिता निविदा काढणे :– वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीद्वारे विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता सामाजिक संस्था निश्चित करणे.

3. राज्यांमध्ये पथनाटयांचे आयोजन करणे :– राज्यांमध्ये तालुका स्तरावर बाल हक्क संरक्षणाबाबत दक्षिण मध्य सांस्कृतिक केन्द्र नागपूर यांचे मदतीने पथनाटयांचे आयोजन करण्यात येईल. दक्षिण मध्य सांस्कृतिक केन्द्र हे केन्द्रशासनाचा उपक्रम असल्याने पथनाटयाकरिता आयोगाला जास्त खर्च येणार नाही. त्यामुळे केन्द्राची संस्थेमार्फत राज्यामध्ये पथनाटयाचे आयोजन करणे.

4. सर्व शिक्षा अभियान याकरिता तज्ञांना देण्यात येणारे मानधन निश्चित करणे.

5. राष्ट्रीय स्तरावरील बाल मेळावा नोव्हेंबर अखेर अथवा डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात आयोजित करणे

6. बाल हक्क व मोफत व सक्तीचे शिक्षण या विषयावर पोस्टर तयार करणेबाबत स्पर्धा आयोजित करणे

7. जानेवारी 2013 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आयोजित करणे

8. श्रीमती राधा भट्ट यांचे विमान प्रवास भाडे रू.10,350/– खर्चास मान्यता देणे :– आयोगामार्फत धारावी येथे दिनांक 31 जुलै, 2012 रोजी बाल हक्क व झोपडपट्टी या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता देशभरातून त्या क्षेत्रातील वक्ते यांना बोलविण्यात आले होते व त्याकरिता त्यांना अेसी 2 टायर देण्यात येणार होते. तथापि श्रीमती राधा भट्ट, गांधी शांती प्रतिश्ठान हया वयोवृध्द असल्याने त्यांनी मुंबई–दिल्ली हा प्रवास विमानाने केला आहे. मुंबई–दिल्ली अेसी 2 टायरचा खर्च रू. 3150/– इतका होतो. तथापि विमान प्रवासाचे भाडे रू. 10,350/– असून रू. 7200 इतकी रक्कम जास्त असल्याने त्यास विशेश बाब म्हणून मान्यता देण्यात यावी.

9 .धारावी येथील कार्यशाळेसाठी आमंत्रितांच्या जेवणावरील झालेल्या अतिरिक्त रू. 8250/– एवढया खर्चास मान्यता देणे :– दिनांक 31 जुलै, 2012 रोजी बाल हक्क व झोपडपट्टी या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यशाळेकरिता जवळपास 300 आमंत्रित येण्याची शक्यता होती तथापि सदर कार्यशाळेस मा. मंत्री महोदया, मा. राज्यमंत्री महोदया हजर असल्याने त्यांचे समवेत असलेले कार्यकर्ते, पोलीस व इतर असे एकूण 50 व्यक्ती वाढल्याने जेवणाकरिता रू. 8250 एवढा जास्त खर्च आला. एवढया खर्चास मान्यता देण्यात यावी.

(स.श्री.सुपे)
प्रशासकीय अधिकारी

दिनांक 31 ऑगस्ट 2012 रोजी आयोगाच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

1. दिनांक 16 जुलै 2012 चे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

2. शाळा सोडून जाणा–या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता सामाजिक संस्था निश्चित करण्याकरिता निविदा काढणे :– वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीद्वारे विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता सामाजिक संस्था निश्चित करण्यात यावी.

3. राज्यांमध्ये पथनाटयांचे आयोजन करणे :– राज्यांमध्ये तालुका स्तरावर बाल हक्क संरक्षणाबाबत दक्षिण मध्य सांस्कृतिक केन्द्र नागपूर यांचे मदतीने पथनाटयांचे आयोजन करण्यात येईल. दक्षिण मध्य सांस्कृतिक केन्द्र हे केन्द्रशासनाचा उपकम असल्याने पथनाटयाकरिता आयोगाला जास्त खर्च येणार नाही. त्यामुळे केन्द्राची संस्थेमार्फत राज्यामध्ये पथनाटयाचे आयोजन करण्यात यावे.

4. सर्व शिक्षा अभियान याकरिता तज्ञांना देण्यात येणारे मानधन निश्चित करणे :– यावर पुन्हा एकदा अभ्यास करून एक निश्चित ठराव पुढील बैठकीत आणण्यात यावा.

5. राष्ट्रीय स्तरावरील बाल मेळावा नोव्हेंबर अखेर अथवा डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात आयोजित करणे :–राष्ट्रीय बाल मेळावा मुंबई येथे आयोजित न करता राज्यातील इतर ठिकाणी आयोजित जसे नागपूर विभागातील वर्धा किवा गडचिरोली येथे नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान किवा त्यानंतर बाल मेळावा आयोजित करण्यात यावा.

6. बाल हक्क व मोफत व सक्तीचे शिक्षण या विषयावर पोस्टर तयार करणेबाबत स्पर्धा आयोजित करणे :– सदर प्रस्ताव मान्य करण्यात आला. याबाबत पुढील कार्यवाही आयोगामार्फत करण्यात येईल.

7. जानेवारी 2013 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आयोजित करणे :– याबाबत पुढील बैठकीत सखोल विषयावर विचार विनिमय करून कार्यवाही करणे.

8. धारावी येथील आयोजित राष्ट्रीय परिषदकरिता **resource person** म्हणून आलेल्या गांधी शांती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती राधा भट्ट यांचे विमान प्रवास भाडे रू. 10,350/– खर्चास मान्यता देणे :– खर्चास मान्यता देण्यात आली.

9. धारावी येथील कार्यशाळेसाठी आमंत्रितांच्या जेवणावरील झालेल्या अतिरिक्त रू. 8250/– एवढया खर्चास मान्यता देणे :– खर्चास मान्यता देण्यात यावी.

( अ.ना.त्रिपाठी )
सचिव
बाल हक्क संरक्षण आयोग

( उज्जवल उके )
प्रभारी अध्यक्ष तथा प्रधान सचिव
बाल हक्क संरक्षण आयोग